# मुले अचूक शिकतील !

मुले जन्माला आल्यापासून , आपल्या पंचेंद्रियांनी आजूबाजूचे जग आकळून घेण्याचा प्रयत्न करीत असतात. निसर्गानेच हे काम त्यांच्यावर सोपवलेले असते. पाहून , ऐकून, वास घेऊन , चव घेऊन आणि स्पर्श करून मुले आपल्या आसपासचे जग समजावून घेत असतात. लहान वयांत चालणारे बालकांचे हे स्वयंशिक्षणाचे कार्य असते. मुलांची , जगाची ओळख करून घेण्याची प्रक्रिया कसकशी चालते याचे खूपसे स्पष्टीकरण आधुनिक मानसशास्त्राने दिलेले आहे. पंचेंद्रियांच्या साहाय्याने आपल्या मनात, विविध वस्तूंच्या नि व्यक्तींच्या प्रतिमा , मुले, रेखाटत असतात. गरजेनुसार त्यांत बदल करीत जातात. आपल्या निसर्गदत्त अशा विविध क्षमतांच्या साहाय्याने त्यांत , वेळोवेळी बदल करीत अचूकता आणतात. मुलांचा नैसर्गिक कल या अचूकतेकडे असतो.

मुलांना जेव्हा बोलता येऊ लागते तेव्हा शिकण्याचे एक नवे , प्रभावी असे साधन मुलांच्या हाती येते. भाषा हे जेवढे सामाजिक तेवढेच ते वैयक्तिक स्वरूपाचे साधन असते. मुले भाषा शिकतात ती परिसरात असलेली, आणि संबंधित प्रौढ लोक बोलत असलेली भाषा या अर्थाने भाषा ही "सामाजिक ' गोष्ट आहे. परंतु भाषा शिकण्याची क्षमता ही उपजत असते, नैसर्गिक असते. मेंदूमध्ये भाषा बोलण्याची आणि भाषा आकलन करण्याची अशी वेगवेगळी केंद्रे असतात. ती निसर्गदत्त असतात. स्वरयंत्रेही निसर्गानेच बहाल केलेली असतात. प्रत्येकालाच ती प्राप्त असतात. भाषेच्याकरवी मुले इतरांशी संवाद साधू शकतात , भाषेकरवी स्वत:ला व्यक्त करू शकतात. भाषेकरवी कल्पनांच्या विश्वात वावरू शकतात , आणि भाषेकरवी तार्किक विचारही करू शकतात. भाषेच्या या विविध हातांनी मुले भरभरून शिकत असतात.

भाषा शिकण्याचे, सर्व बारकाव्यांनी भाषा आत्मसात करण्याचेही एक विशिष्ट वय असते. साधारणपणे दीड-दोन वर्षांपासून मुले भाषा बोलायला लागतात आणि वयाच्या सहाव्या वर्षापर्यंत , मुले, भाषेच्या व्याकरणासहित हजारो शब्दांचा अर्थपूर्ण वापर करायला शिकतात. पुढे वयाच्या दहाव्या-अकराव्या वर्षांपर्यंत त्यांची भाषेची अभिव्यक्ती आणि भाषेच्या आकलनाची शक्ती चांगलीच वाढलेली असते. आणि भाषिक समृद्ध अनुभवांची साथ मिळाल्यास , वाचणे, लिहिणे या नवसाधनांच्या साहाय्याने वयाच्या पंधरा-सोळाव्या वर्षांपर्यंत मुले "भाषाप्रभू ' बनतात. या विविध कालावधींना मेंदूमधील ज्ञानग्रहणाची "संधींची गवाक्षे ' असे म्हटले जाते. कारण, या काळात मुले भाषा कितीतरी वेगाने शिकतात.

भाषा आत्मसात केल्याने मुलाचे वैयक्तिक आणि सामाजिक जीवन फुलून येते. भाषा हे मनुष्याचे सर्वांत प्रभावी असे शिक्षणाचे मानसिक साधन असते. मुले भाषेकरवी केवळ माहितीचा साठाच वाढवतात असे नाही, तर ती

भाषेकरवी जगातील विविध भौतिक गोष्टी , व्यक्ती व त्यांचे मानसव्यवहार आणि विविध घटनांमधील विश्लेषक अशा माहितीतील अर्थात्मकतेचा शोध घेत असतात. हा शोध मन:पटलावर उमटणाऱ्या आकृतिबंधांकरवी घेतला जातो. ज्या गोष्टींची नीटपणे समज येते, त्यांचे नेमकेपणाने आकृतिबंध तयार होतात. त्यामुळे नुसते जाणणे नव्हे तर अर्थपूर्ण जाणणे म्हणजे व्यक्तीचे शिक्षण असते. मुलांची नैसर्गिक प्रवृत्ती असते ती अचूकपणे अर्थात्मकतेचा शोध घेण्याची. प्रौढांची जबाबदारी असते ती यासाठी मुलांना संधी पुरविण्याची.

मुले जेव्हा उपजत अशा अंतर्गत प्रेरणेने शिकतात , जोडीला समृद्ध अशी परिसरभाषा असते, तेव्हा आपल्या सदा तरतरीत मेंदूच्या साहाय्याने मुले सर्वच अभ्यासविषयांतील अर्थात्मकतेचा अचूकपणे शोध घेऊ लागतात. विविध विषयांतील स्वतःच्या संकल्पना स्पष्ट करून घेतात.

ज्ञानग्रहणाच्या अंगाने विचार करता , आपल्या शालेय शिक्षणातील प्रश्नोत्तरे घोकण्याचा किंवा संस्कारांच्या नावाखाली विविध गोष्टींचे पाठांतर करून घेण्याचा , फारसा उपयोग होत नाही. किंबहुना अशा अर्थविहीन पाठांतरांतून मुलांचे खूपसे श्रम आणि बराचसा काळ वाया जातो. शाळांतून अगदी सुरुवातीला शिकविल्या जाणाऱ्या बाराखडीत मुले रमत नाहीत ते त्याच्या "निरर्थकपणा 'मुळेच. उलट , अशा अर्थविहीन गोष्टींमुळे मुले कंटाळतात ; मुलांच्या शिकण्यातील रसच कमी होतो. याउलट, स्वतःच्या परिसरातील अर्थपूर्ण शब्दांच्या साहाय्याने शिकण्याची सुरुवात झाली तर मुले वाचन-लेखन अतिशय अल्पकाळात नि आनंदाने शिकतात. याचा आणखीही एक फायदा होतो. अर्थपूर्ण शिकण्याने मुले संकल्पनांच्या अमूर्त पातळीवर अलगद उतरतात.

अभ्यासाच्या प्रत्येक विषयात त्यांच्या त्यांच्या सैद्धांतिक संकल्पना असतात. त्या समजावून घेण्याची नि अभिव्यक्त करण्याची स्वतःची तांत्रिक भाषा असते. जेव्हा मुले या तांत्रिक भाषेशी अनुभवांच्या मार्गाने खेळतात तेव्हा त्या भाषेबरोबरच आणि त्या भाषेकरवी अमूर्त संकल्पना समजावून घेण्याच्या पायऱ्या आपल्या आपणच म्हणजे स्वप्रयत्नाचे चढून जातात.

आई वडील, शिक्षक-शिक्षिकांना मुलांना बौद्धिकतेच्या अमूर्त पातळीवर अचूकपणे न्यायचे असेल तर अभ्यासाचा सारा बाजच बदलावा लागतो. कृतिशील अनुभव आणि त्यांची व्यावहारिक सांधेजोड असलेली शिक्षणपद्धती आपण समजावून घेऊन मुलांपर्यंत पोचवली तर मुले अचूकपणे शिकतील !

❖